**प्रसिद्धिपत्रक**

**पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,**
**बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस जवळ, पुणे-४११००६**
**फोन नं. ०२०-२६६८५०००**

जा.क्र./पोउआ/वाह/ २०३४ /२०२५ पुणे दिनांक - १० /३/२०२५

पुणे शहरातील खराडी वाहतूक विभागांतर्गत खराडी दर्गा चौक येथील वाहतुक कोंडी कमी करणे तसेच वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए -२, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी अमोल झेंडे, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक शाखा, पुणे शहर, खराडी वाहतुक विभागातील खालील नमुद रस्त्यावर तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे. सदर ठिकाणी यापर्वी काही आदेश असतील ते रद्द करण्यात येत आहे.

**खराडी वाहतुक विभाग पुणे अंतर्गत खराडी दर्गा चौकातील वाहतुकी मध्ये खालील प्रमाणे बदल करण्यात येत आहेत.**

- **पुणे व खराडी बायपास कडुन येवून खराडी दर्गा चौकातुन उजवी कडे वळण घेवुन खराडी गाव / यु आन आय.टी.पार्क कडे जाणाऱ्या वाहनांना उजवीकडे वळण घेण्यास ( राईट टर्न ) बंद करण्यात येत आहे.**

**पर्यायी मार्ग** - सदर वाहनांनी खराडी बायपास चौकातुन सरळ पुढे २५० मीटर अंतर जावुन आपले घर बसस्टॉपचे पुढील बाजुस यु टर्न घेवुन खराडी दर्गा चौकातुन डावीकडे वळण घेवुन इच्छित स्थळी जावे.

तरी नागरीकांनी याबाबत आपल्या काही सुचना असल्यास त्या पोलीस उप-आयुक्त, वाहतूक नियंत्रण शाखा, येरवडा पोस्ट ऑफीस, बंगला नं-६ जेल रोड पुणे यांचे कार्यालयात दिनांक –१० / ३ /२०२५ ते दिनांक – २५ / ३ /२०२५ पर्यंत लेखी स्वरूपात कळवाव्यात. नागरीकांच्या सूचना व हरकतींचा विचार करुन व अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, इ.) खेरीज करून अंतिम आदेश काढण्यात येतील.

पोलीस उपआयुक्त वाहतुक विभाग, पुणे.

**(अमोल झेंडे)**
पोलीस उप-आयुक्त ,वाहतूक
पुणे शहर

प्रति,

**१) जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी,** नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१

२/- सदरची प्रेसनोट सर्व वर्तमानपत्रातुन प्रसिध्द करण्याची विनंती आहे.

प्रत :- **२)सहा. पोलीस आयुक्त, वाहतूक,** पुणे शहर.

**३) पोलीस निरिक्षक, प्रेसरूम,** पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर

२/- सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमानपत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

**४) प्रभारी अधिकारी खराडी** वाहतुक विभाग, पुणे शहर.

२/- **सदर प्रेसनोटच्या प्रती संबंधित दुकानदार / प्रतिष्ठीत व स्थानिक नागरिक यांना तात्काळ अदा करून, त्यांची स्वाक्षरी घेण्यात यावी तसेच अंतिम प्रेसनोट सादर करावी.**

**५) पोलीस उप निरीक्षक, मल्टीमिडीया कक्ष, वाहतूक शाखा, पुणे शहर**

२/- सदर प्रेसनोट ही पुणे वाहतुक पोलीस वेबसाईट व फेसबुकवर / व्टिटरवर अपलोड करावी. सदरची प्रेसनोट कोणत्या वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली आहे, त्या वर्तमानपत्राचे कात्रणाची छायांकित प्रत इकडील कार्यालयात सादर करावी.

**६) पोलीस निरीक्षक, नियोजन, वाहतूक शाखा, पुणे शहर**

२/- संबंधित विभागांचे प्रभारी अधिकारी यांचेकडून पुर्तता अहवाल प्राप्त करुन घेऊन सादर करावा.